

नगरपालिका नगरवाचनालय, कऱ्हाड

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

व्याख्याते : डॉ. भालचंद्र दिनकर फडके

१२ मार्च १९७८

923.60954
NAG
G04277

# यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

वर्ष ६ वे १९७८

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04277
D 8/6/2015

923.60954/NAG
Y.C.P. LIBRARY
G04277

किंमत पांच रुपये

*

प्रकाशन :

आमदार

**श्री. पी. बी. साळुंखे**

कोल्हापूर.

यांच्या शुभहस्ते

१० मार्च १९७९

*

प्रकाशक :

**श्री. पी. डी. पाटील**

अध्यक्ष,

कराड नगरपालिका, कराड.

*

मुद्रक :

**कराड मुद्रणालय, कराड.**

२३९/२० शनिवार पेठ,

कराड.

---

**मुखपृष्ठ छपाई व रचना :** व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनीट, कोल्हापूर.



मा. यशवंतराव चव्हाण

# मनोगत

'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' ही १९७३ साली सुरू झाली. १९७८ सालातील यशवंतरावांच्या वाढदिवशी ज्या थोर विचारवंताचे व्याख्यान झाले, त्याची ही मुद्रित प्रत वाचकांच्या हाती देताना मनाला एक समाधान जाणवते.

साहित्य, सौंदर्य, संगीत, क्रीडा, करमणूक या समाजजीवनाला सामर्थ्य देणाऱ्या गोष्टी आहेत. शारदीय व्याख्यानमालेच्या निमित्ताने कराड नगरपालिकेने या संदर्भात कराडची एक वैशिष्ठ्यपूर्ण अभिरूची निर्माण केली आहे.

कराडचे सुपुत्र यशवंतरावजी चव्हाण यांच्या स्वरूपात दिसणारे नेत्रदीपक प्रज्ञाप्रचीतीचे राजकीय आणि सामाजिक व्यक्तिमत्त्व कलेकलेने साकारत गेले; त्याचा विचार नि उच्चार समाज परिवर्तनाला उपकारक ठरेल या भावनेने त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' स्वतंत्रपणे आयोजित करण्यात निश्चित औचित्य आहे ! आमच्या भारतीय समाजाच्या नि राष्ट्रीय जीवनाच्या समस्या, आव्हानाचे स्वरूप घेऊन आपल्यापुढे उभ्या ठाकल्या आहेत; त्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्यांचा अभ्यासपूर्ण उहापोह, अधिकारी व्यक्तिच्या आयोजित व्याख्यानातून व्हावा, हाच प्रधान हेतू या व्याख्यानमालेचा आहे ! !

आमच्या निमंत्रणाला मान देऊन डॉ. भालचंद्र फडके, पुणे या थोर विचारवंतानी या मालेत व्याख्यान दिले, त्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानणे आमचे कर्तव्य आहे.

व्हिज्युअल डिझाईन रिसर्च युनिट, कोल्हापूरचे डिझाईन आर्टिस्ट श्री. भूपाल मांगोरे यांनी सदर पुस्तिकेचे बाह्यांग आकर्षित व मनोवेधक करणेसाठी जे परिश्रम घेतले; तसेच कराड मुद्रणालयाचे व्यवस्थापक नि कामगार यांनी ही पुस्तिका वेळेवर व सुबक छापून दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या व्याख्यानमालेत जे जे विचारमंथन, चिंतन होईल ते ते त्याच विचारवंतांच्या भाषेत 'अक्षर' करण्याच्या हेतूने प्रतिवर्षी व्याख्यानांची पुस्तिका प्रसिद्ध केली जावी हा ही हेतू आहे. ही पुस्तिका समाज पुरुषाच्या हाती देताना एकच प्रार्थना –

मा. यशवंतरावजीना राष्ट्रसेवेसाठी उदंड आयुरारोग्य लाभो ! त्यांच्या जीवनाचा आदर्श नव्या पिढीला जीवनाची विधायक दृष्टी देणारा ठरो !

**कराड** **पी. डी. पाटील**

दिनांक १० मार्च १९७९. नगराध्यक्ष.

# ' अं त रं ग '

१२ मार्च १९७८

## " डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती "

डॉ. भालचंद्र दिनकर फडके
व्याख्याते
मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे



# " डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती "

**डॉ. भालचंद्र दिनकर फडके**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही केवळ महान व्यक्ती नव्हती, तर ती एक सर्वंकष क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडणारी व त्यासाठी लढणारी एक शक्ती होती, नवसमाज निर्मितीचे स्वप्न पाहाणारी प्रवृत्ती होती. ' मनुष्यत्वाची प्रतिष्ठा ' हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, आगरकर आदी महापुरुषांच्या परंपरेतील बाबासाहेबांनी व्यक्तिपूजेपेक्षा विचारांची पूजा श्रेष्ठ मानली. महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहापासून बाबासाहेबांनी जो दलितांचा मुक्तिसंग्राम सुरू केला तो एका अर्थाने मानव मुक्तीचा लढा होता. " शिका, संघटित व्हा आणि लढा " असा आदेश देत त्यांनी समाज क्रांतीची गती वाढवली. त्यांनी ' धर्मांतरा 'चा निर्णय घेतला तो केवळ राजकीय स्टंट म्हणून नव्हे तर ते धर्मांतर सांस्कृतिक पुनरुत्थानासाठी होते. त्यांनी दलितांची ' अस्मिता ' जागी केली. प्रतिगामी प्रवृत्तीशी संघर्ष करूनच क्रांती यशस्वी होईल पण त्यांनी ' हिंसे ' चा मार्ग अवलंबिला नाही. कारण त्यांची श्रद्धा होती की विचाराचा पराभव विचारच करू शकतो. मात्र जरूर असेल तर सर्वंकष क्रांतीसाठी रक्ताचे अर्घ्य द्यायला ते सिद्ध होते.

**डॉ. भालचंद्र दिनकर फडके**

एम्. ए., बी. टी., पीएच्. डी.

जन्म १९२५

सध्या पुणे विद्यापीठात मराठीचे व्याख्याते म्हणून काम करतात.

नोकरी करीत करीत शिक्षण, जवळ जवळ ३६ वर्षे शिक्षक म्हणून सेवा.

' महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे ' माजी संपादक. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे सदस्य व मराठी भाषा अभ्यास मंडळाचे निमंत्रक. मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद, शासकीय शिक्षण सेवांतर्गत विदर्भ महाविद्यालय अमरावती येथे प्राध्यापक, महाराष्ट्रात अनेक व्याख्यानमाला गुंफल्या, पुणे विद्यापीठाची कै. केळकर व्याख्यानमाला. नाथमाधव व्याख्यानमाला, कै. गजेंद्रगडकर व्याख्यानमाला, गडकरी व्याख्यानमाला शिवाय आकाशवाणी, दूरदर्शनवर व्याख्याने.

मराठीतील प्रतिष्ठान नवभारत, सत्यकथा, युगवाणी, केसरी, सकाळ, स्वराज्य, ललित–साहित्य पत्रिका इ. मधून समीक्षा लेखन.

पीएच्. डी. चा प्रबंध ' मराठी कथेची वाटचाल ( १८००–१९५० ) ' मराठवाडा विद्यापीठाने १९६७ मध्ये स्वीकृत.

दलित साहित्य : वेदना व विद्रोह हे पुस्तक १९७७ मध्ये प्रसिद्ध झाले. याशिवाय काव्यसरिता, विचारधन, सहा कथाकार, संगीत शारदा, अरविंद गोखले यांची कथा, धग इ, संपादित पुस्तके; शिवाय संशोधनपर लेख.

पुणे विद्यापीठाच्या सिनेट, विद्वत् सभा, पदव्युत्तर संशोधन मंडळ, मराठी अभ्यास मंडळ, विद्याशाखा इ, अनेक मंडळांचे सभासद. पाठ्य पुस्तक निर्मिती व संशोधन मंडळाच्या ( बालभारती ) मराठी अभ्यास समितीचे सदस्य.

कराड नगरपालिकेचे माननीय नगराध्यक्ष श्री. पाटील, उपाध्यक्ष श्री. जाधव आणि मित्रहो

माननीय यशवंतराव यांच्या गौरवाप्रीत्यर्थ आपण जी व्याख्यान-माला सुरू केली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि या व्याख्यानमालेतील आजचे व्याख्यानपुष्प गुंफण्याची आपण मला प्रेमाने संधी दिलीत याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहे.

प्रथम गेल्यावर्षी दिली गेलेली व्याख्याने आज पुस्तक रूपाने सिद्ध झाली आहेत या पुस्तकाचे आज प्रकाशन झाल्याचे आनंदाने जाहीर करतो.

आज माननीय यशवंतराव चव्हाण यांचा वाढदिवस त्या निमित्तानं या महान नेत्याला दीर्घायुरारोग्य चिंतू या. यशवंतरावांचा एका अर्थाने आमच्या कुटुंबियांशी वेगवेगळ्या संदर्भात निकटचा संबंध आला. माझे धाकटे बंधू मुंबई विद्यापीठात राज्यशास्त्र विभागात काम करतात. संयुक्त महाराष्ट्राच्या निमित्ताने जे आंदोलन झाले त्याचा सर्वांगीण अभ्यास करीत असता त्यांच्या यशवंतरावा-बरोबर अनेक बैठकी झाल्या. त्याचा वृत्तांत ऐकत असता यशवंतरावाबद्दल अनेक गोष्टी कळत गेल्या. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत यशवंतरावांनी एक ऐतिहासिक भूमिका बजावली आहे आणि महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर त्यांनी मराठी माणसांची अनेक स्वप्ने साकार केली आहेत. माझे सासरे डॉ. बा. शं. कदम या महाराष्ट्र राज्याचे शेती खात्याचे संचालक होते. तेही अनेक

वेळा यशवंतरावांविषयी बोलत. यशवंतराव एक कुशल प्रशासक आहेत तसे ते राजकारण धुरंधर आहेत. जीवनाच्या विविध क्षेत्रात अनेक गुणी व्यक्तींना त्यांनी प्रोत्साहन दिले आहे.

आज यशवंतरावांच्या व्यक्तिमत्वाविषयी मराठी माणूस उलटसुलट चर्चा करीत आहे. जे यशवंतरावांचे बोट धरून आले त्यांचेही काही म्हणणे आहे. काही टीकाकार म्हणतात की यशवंतरावांच्या युगाचा अस्त झाला. पण आज नरूभाऊंनी लिहिलंय की नव्या युगाला आरंभ झाला आहे. यशवंतरावांच्या राजकीय हालचालीबद्दल त्यांनी घेतलेल्या भूमिकांबद्दल काळच निर्णय करील. पण यशवंतरावांनी आज जे महत्वाचं पाऊल उचललं आहे ते फार महत्वाचं आहे. त्यांनी आता एक ठाम भूमिका घेतली आहे की व्यक्तिपूजेपेक्षा विचाराची पूजा महत्वाची आहे. व्यक्तिपूजेतून एकाधिकारशाही वाढते पण विचाराच्या पूजेमुळे लोकशाही बळकट होते. विचाराचा पराभव विचारानेच केला पाहिजे. पण दुर्दैवाने या देशात विचार नष्ट करण्यासाठी हिंसाचार जन्माला येत आहे. विभूतिपूजा हा या देशातील असाध्य रोग आहे. म्हणून विभूतिपूजेचे उच्चाटन करण्यासाठी विचार वाढला पाहिजे. वर्गद्वेष, जातिद्वेष, हिंसा, दारिद्रय, वामाचार, क्रौर्य इ. अनेक कुरूपतांनी या देशाचे जीवन माखलेलं आहे. हा देश सुजलाम् सुफलाम् व्हायचा असेल, या देशात न्यायनीतीचे राज्य निर्माण व्हायचे असेल तर सम्यक् क्रांती व्हायला हवी, समाजपरिवर्तनात गती यायला हवी.

समाजक्रांतीसाठी झगडणारे जे रणझुंजार महापुरुष होऊन गेले त्यात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समावेश करावा लागेल. माझे भाग्य थोर की

मला डॉ. बाबासाहेबांना जवळून पाहता आले. माझ्यासमोर उभे राहते ते नागपूरचे दीक्षा मैदान, बौद्धधर्म स्वीकारण्यासाठी देशाच्या कोनाकोपऱ्यातून आलेला पाच-सहा लाखांचा जनसमुदाय, बौद्ध धम्माची दीक्षा देण्यासाठी आलेले भिक्कू महाथेरो चंद्रमणी आणि त्यांचे सहकारी, देशविदेशातील पाहुणे, सुगंधी फुलांच्या माळानी सजविलेला रंगमंच आणि एक ऐतिहासिक निर्णय घेऊन दलितांच्या मुक्तिसंग्रामाच्या नव्या पर्वाचा आरंभ करणारे धीरगंभीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर! हा सुवर्ण दिवस मी कसा विसरू शकेन ? याच भव्य रंगमंचावर प्राचार्य म. भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे नाटक लाखो लोकांच्या उपस्थितीत आम्ही सादर केले होते. रामायणकालापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत अस्पृश्यांवर जे अत्याचार झाले त्याचे दर्शन घडविणारे विविध प्रवेश चिटणीसांनी लिहिले आहेत. त्यातला नभोवक्ता म्हणतो, आजपर्यंत ज्यांची माणुसकी हिरावली जाऊन पशूहूनही हीन जगणं ज्यांच्या कपाळी आलं होतं त्या सर्वांच्या अन्यायांविरुद्ध धुमसणारा मूक क्षोभ ज्या पुरुषाच्या अंत:करणात प्रकट झाला तो महापुरुष म्हणजे डॉ. भीमराव आंबेडकर !

या महापुरुषाच्या प्रेरणेनं स्थापन झालेल्या मिलिन्द महाविद्यालयात मी शिकवीत होतो. बाबासाहेबांच्या विचारानं घडत चाललेली तरुण मन वसतिगृहात पाहत होतो. त्यांची सुखदु:खं, त्यांची स्वप्नें, त्यांच्या आशा आकांक्षा समजावून घेत होतो. गावकुसाबाहेरच्या या जगाला कोणी अस्मिता दिली असेल तर ती बाबासाहेबांनीच. त्यांनीच या उपेक्षित, दलित मनाला वाचा दिली. त्यांनीच त्यांचा स्वाभिमान जिवंत केला.

देश स्वतंत्र झाला आहे त्याला आज पंचवीस वर्षापेक्षा अधिक

काळ लोटला तरी दलित माणसाला वाटते आहे की हा देश माझा आहे का ? माणूसपणा नाकारणाऱ्या या समाजात माझी जागा कोणती ? वेदना ही विद्रोहाची जननी आहे. या तीस वर्षात जर काही घडलं असेल तर जे आजवर दडपले गेले होते ते 'माणूस' म्हणून मानानं जगण्यासाठी संघर्ष करायला सिद्ध झालेले आहे. त्यांनी किती दिवस वाट पाह्यची ? त्यांना या देशात अन्न, वस्त्र आणि आसरा धड मिळत नाही ही काय अभिमानाची बाब आहे ? राजकारणी माणसे सत्तेच्या खेळात दंग आहेत. या ना त्या मार्गानं सत्ता मिळवायची आणि आत्मकल्याण करून घ्यायचे हा आजचा मंत्र आहे. सत्तेपुढं शहाणपण चालत नाही असं म्हणतात पण अनुभव असा की सत्तेलाच शहाणपण नाही. सत्तेपुढे न वाकता सत्यासाठी आग्रह धरला पाहिजे. स्वातंत्र्यानंतर ज्यांच्या हाती सत्ता आणि संपत्ती प्रथमच आली त्यांना ती भोगण्यापलीकडे दुसरे काहीच माहीत नाही. सत्ता आणि संपत्ती या आंधळ्या शक्तीतले हलाहल पचवायला 'यती' वृत्तीची माणसे लागतात. आज 'यती' ऐवजी 'ययाती' चा सुळसुळाट आहे. भोगभोगूनही ही माणसे अतृप्त आहेत. भोगण्यासाठी ती कुणाचाही बळी घेतात. आज सत्तापूजन, द्रव्यपूजन इतके वाढले आहे की या देशात त्यामुळे वैचारिक, भावनिक, अर्थिक, नैतिक अराजकाचा वणवा पेटला आहे. समाजाची आर्थिक दुःस्थिती, मानसिक दुरवस्था, जीवनकलहामुळे कुटुंब-व्यवस्थेची झालेली मोडतोड, दिशाहीनता जुन्या मूल्यांचा विध्वंस, नव्या श्रद्धांचा अभाव इ. अनेक दुखणी समाजाची आहेत. स्वातंत्र्य मिळूनही सामान्य माणूस सुखी नाही. 'गरीबी हटाओ' इ. अनेक घोषणा होतात, अनेक कलमी कार्यक्रम जाहीर होतात. पण सामान्य माणूस अन्याय सहन करतो, दारिद्रय भोगतो, छळ

सोसतो. या सामान्य माणसाच्या बाजूने डॉ. आंबेडकर उभे राहिले. डॉ. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर 'भारताचा शोध' घेणारे पंडितजी आमच्या मिलिन्द महाविद्यालयात आले होते तेव्हा ते म्हणाले की हिन्दु समाजाच्या प्रत्येक जुलुमाविरुद्ध पुकारलेल्या बंडाचे प्रतीक म्हणजे डॉ. आंबेडकर ! फ्रान्समधील एमिल झोला हा महान ललितलेखक सामान्य माणसाला न्याय मिळावा म्हणून I accuse अशी गर्जना करीत राजसत्तेविरुद्ध दंड थोपटून निर्भय-पणे उभा राहिला. त्याची श्रद्धा होती की व्यक्ती काय जन्मते आणि मरते पण त्याचा विचार मात्र कधीच मरण पावत नाही. कारण सत्ता शासन करते आणि विचार चिरडण्याचा प्रयत्न करते पण सत्ता आज आहे उद्या नाहीशी होते. पण न्याय-निती-साठी झुंजणाऱ्या व्यक्तीचा विचार मागे राहतो. तो विचार पिढ्यानपिढ्याचे धन बनतो. बाबासाहेबांचा विचार मरण पावणार नाही. त्या विचाराने अनेक मने पेटविली आहेत अनेक मने भारून टाकली आहेत. कारण त्या विचारात चैतन्य आहे. आमच्या विद्यार्थ्यांना बाबासाहेब सांगत की अन्याय झाला तर त्याच्यासमोर नम्र होऊ नका. सत्यासमोर, ज्ञानासमोर कर्तृत्वा-समोर नम्र व्हा. अन्याय करणारी व्यक्ती कितीही मोठी असो, अन्याय करणारा समाज कितीही शक्तिमान असो त्याच्यविरुद्ध व्यक्तिने, समाजाने झुंज दिली पाहिजे आंबेडकरांचा विचारच सांगतो की व्यक्तिपेक्षा विचार मोठा. स्वामी विवेकानंद म्हणत की व्यक्तीसाठी जगू नका तत्वासाठी जगा. समाजात तत्वनिष्ठ माणसं थोडी असतात बाकी सगळे तडजोडवादी, लाचार ! बाबासाहेब तत्वनिष्ट होते. आपल्या तत्वापायी त्यांनी हवी ती किंमत दिली. व्यक्तिपूजा वा विभूतिपूजा राजकरणातील विवेक-वादाला घातक असते असे ते मानत. ज्या समाजात व्यक्तिपूजा

चालते तो समाज दुबळा असतो. या देशात मोठमोठ्या विभूती जन्माला आल्या आणि काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावल्या. या विभूतींनी मानवाच्या चिरंतन सुखासाठी तत्त्वज्ञान मांडले पण या विभूतींच्या तत्वज्ञानाचे चिंतन, मनन करण्याऐवजी त्यांच्या चाहत्यांनी, भक्तांनी त्यांचे पुतळे उभे केले, मंदिरे निर्माण केली आणि त्यांच्या बाह्यगोष्टीचे अनुकरण केले. प्राध्यापक माटे म्हणाले होते की गुरुभक्ती ही महान व्याधी आहे. इतिहासाची साक्ष अशी आहे की गुरुच्या विचाराचा पराभव त्याचे शिष्यच सहज करू शकतात. रामदासांनी प्रपंचविज्ञान मांडले आणि समर्थपणे नेटका प्रपंच करण्याचे आवाहन केले पण त्यांच्या पारमार्थिक शिष्यांनी रामदासांच्या तत्वज्ञानाचा पराभव केला. एकोणिसाव्या शतकात ज्योतिरावांनी मानवधर्माची ध्वजा फडकाविली. मनुष्यत्वाची प्रतिष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे असे मानणाऱ्या सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या वर्णव्यवस्थेने व जातिव्यस्थेने माणसामाणसात भेद निर्माण केला आहे. या सामाजिक विषमतेविरुद्ध महात्मा ज्योतिबांनी बंड पुकारले. मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि जातिभेद व धर्मभेद यांना धिक्कारणारी विचारसरणी ज्योतिबांनी आवेशाने सांगितली. ज्योतिबा हे भारतातील लोकशाही क्रांतीचे अग्रदूत होते. हाती येईल त्या शस्त्राने 'ब्राह्मणशाही' चा नायनाट करण्याचे धोरण फुल्यांनी अवलंबिले त्यांच्या विचाराचा आशय व्यापक भूतदया हा होता. त्यांची सत्यशोधक चळवळ म्हणजे सामाजिक विषमतेविरुद्ध उठविलेला आवाज होता. सामाजिक विषमता हरप्रयत्ने नष्ट करावी, देव आणि भक्त यांच्यातील दलालाला मूठमाती द्यावी, शिक्षण सर्व थरात पसरावे, इंग्रजांशी सलोखा करून सरकारी यंत्रणा काबीज करावी असा चतुर्विध कार्यक्रम त्यांच्या

चळवळीचा होता. पण कालांतराने सत्यशोधक चळवळ सत्ताशोधक बनली. या चळवळीमागच्या उदात्त प्रेरणा मागे पडल्या. मानवी ऐक्य हे एकच सत्य आहे असा उज्वल संदेश देणाऱ्या महात्म्याचा पराभव त्यांच्या तथाकथित अनुयायांनी केला. जोतिराव फुल्यांचे नाव सांगून संकुचित दृष्टी बाळगणाऱ्या अनुयायांना १९५० मध्ये डॉ. बाबासाहेबांनी चांगलेच खडसावले. ते म्हणतात," ब्राह्मणेतर वर्गाने जोतिबा फुले यांची स्मृती सर्वस्वी पुसून टाकली आहे. या वर्गाने निर्लज्जपणे फुले यांचा विश्वासघात केला आहें " महात्मा फुल्यांचे जीवन म्हणजे अखंड युद्ध होते १८५१ त मुलींची शाळा, १८५२ त अस्पृश्यांची शाळा, १८६४ त बालहत्याप्रतिबंधक गृह अशा एकामागोमाग ज्या कृती केल्या त्यामुळे त्यांनी सुधारणेच्या प्रक्रियेला विलक्षण गती दिली. त्यांनी वंचित विधवांना आश्रय दिला. घरातला पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. सारस्वत ब्राह्मण जातीत १८६४ साली पहिला पुर्नविवाह घडवून आणण्याचे श्रेय त्यांचेच. सत्याचा व पतितांचा पालनवाला अशा जोतिरावांनी आपली तत्वे व विचार समाजाच्या खालच्या थरापर्यंत नेऊन पोचविला. जोतिरावांचे कार्य व विचार ही डॉ. आंबेडकरांच्या जीविताची एक महत्त्वाची प्रेरणा होती. चातुर्वर्ण्य व जातिभेद यावर कडाडून हल्ला चढवून सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, बंधुत्त्व व समता या मूल्यांना प्रतिष्ठित करणाऱ्या जोतिरावांना डॉ. आंबेडकर यांनी कबीर व बुद्ध यांच्या बरोबर स्थान दिले होते ही गोष्ट अतिशय महत्वाची आहे. जोतिबा, डॉ. बाबासाहेब इ. व्यक्ती अहोरात्र आपल्या अंगीकृत कार्याचे चिंतन करीत असतात तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे आमुची ती कळवळ्याची जाती, करी लाभाविण प्रीती. या जातीच्या समाजसुधारकांना कीर्ती नको असते, धन नको असते, सत्तास्थाने नको असतात

त्यांनी जो लढा उभा केलेला असतो त्यासाठी त्यांनी सर्वस्व झोकून दिलेले असते. पण दुर्दैव असं की जोतिरावांचा जयजयकार करून सत्तास्थाने काबीज करीत राहणाऱ्यांनी जोतिबांचा विचार बासनात गुंडाळून ठेवला. आज त्यांच्या तत्त्वज्ञानाचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. जोतिरावांच्या विचारातील क्रांतिकारकत्व ओळखून त्यांचे तत्वज्ञान सामाजिक परिवर्तनासाठी वापरले पाहिजे. महात्मा गांधीचं तत्त्वज्ञान देखील गांधीजींचा जयजयकार करणाऱ्या आंधळ्या अनुयायांनी पराभूत करून टाकलं. गांधीजी की जय ! अशा घोषणा देत निवडणुका जिंकल्या, सत्ता भोगली पण सत्य व अहिंसा ही दोन महान तत्त्वे या अनुयायांनी पार पायदळी तुडविली. गांधीजींची जीवनदृष्टी या अनुयायांना समजलीच नाही. नेहरूंच्या तत्त्वज्ञानाचा पराभवही आपण डोळ्यादेखत पाहिला. केवढा मोठा गुरू असू द्या शिष्यांच्या तावडीत सापडला की त्याच्या तत्त्वज्ञानाचा निकाल लागला. डॉ. बाबासाहेबांच्या प्रभावी क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची दुर्दशा होऊ नये असे मला सारखे वाटते. कारण सामाजिक परिवर्तनाला वेग देण्याचे, सामाजिक क्रांती घडवून आणण्याचे सामर्थ्य बाबासाहेबांच्या विचारात आहे.

समतेचा मार्ग ममतेतून जातो पण ज्या समाजात उच्चनीच भाव आहे त्या समाजात ममत्व कसे असणार? डॉ. आंबेडकरांनी एकदा गांधीजींना त्यांच्यासमोर हात पालथा ठेवून विचारले होते की हिंदूंचे चातुर्वर्ण्य असे आहे का? कारण अशी सर्व बोटे एकाच पातळीत असतात. पण हिंदूंचे चातुर्वर्ण्य जिथे बोटे समपातळीत नसून एकावर एक अशी आहेत अशा अवस्थेतील हातासारखे आहे. डॉ. आंबेडकरांना हिंदुधर्मात एकापेक्षा एक कडवट अनुभव आले. प्रत्येक अनुभव त्यांचे माणूसपण नाकारणारा होता.

साताऱच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते शिकत तेव्हा त्यांना कुणी प्यायला पाणी दिलं नाही. गावातल्या पाणवठ्यावर जनावरं पाणी पिऊ शकतात पण माणसासारख्या माणसाला साधं पाणी पिऊ न देणारा हिंदुधर्म किती अमानुष ! लहानपणी शाळेत गणित करायला फळ्याजवळ बाबासाहेब गेले की सवर्णांची पोरं एकच गिल्ला करीत त्याला फळ्याजवळ जाऊ देऊ नका त्याच्याखाली आमचे डबे आहेत. १९३४ साली डॉ. बाबासाहेब दलितांचे नामवंत नेते झाले होते पण दौलताबादच्या किल्ल्यावर तहान लागली तरी पाण्याला स्पर्श करू दिला नाही. असे आणि यापेक्षा कितीतरी कडवट अनुभव बाबासाहेबांना सोसावे लागले. सोसाव्या लागलेल्या मानहानीमुळे, अवहेलनेमुळे, अन्यायामुळे त्यांचे मन सतत बंडाचा झेंडा घेऊन धावत होते. ह्या पृथ्वीतलावर 'अस्पृश्य' म्हणून माणसांना कुत्र्यामांजरापेक्षाही हीन वागविण्यात येते असा भारत हा देश आहे. समाजाचा कसलाही अपराध न करता वर्षानुवर्षे अस्पृश्यतेची राक्षसी शिक्षा भोगत बसलेल्या दुर्दैवी जमातीत बाबासाहेबांच्या वाट्याला आला तो निर्दय, अमानुष छळ ! उच्चवर्णीय समजणाऱ्यांनी त्यांना जन्मभर लाथाडले. पांडित्याबद्दल, कर्तृत्वाबद्दल कुणी कौतुक केलं नाही. परदेशात अध्ययन करीत असता साधा स्लाइसचा तुकडा खाऊन त्यांनी दिवस काढले. त्यांचे ज्ञानावर प्रेम होते. ज्ञान मिळविण्यासाठी अक्षरशः त्यांनी हाडाची काडे केली. धार्मिक व सामाजिक पारतंत्र्याच्या नरकात पाच हजार वर्षे सडत पडलेल्या सात कोटी गुलामांना स्वतंत्र करण्यासाठी तळहातावर शिर घेऊन जो नरवीर साऱ्या हिंदुसमाजाशी लढला त्या बाबासाहेबांचे नाव कोण विसरेल ?

अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे आणि तो धुऊन काढला पाहिजे हा विचार एकोणिसाव्या शतकात उदयास आला आणि हळूहळू वाढीस लागला. समाजाच्या विलक्षण राहाटीमुळे उच्च-नीचत्व अस्तित्वात येऊन तदनुसार जो व्यवसाय विभाग सहजगत्या झालेला आहे त्यास ईश्वरकृत व सनातन मानून उच्च वर्गात जन्मास आलेल्या लोकांनीच या वर्गात जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पृश्ये मानणे यापेक्षा मनुष्याच्या विकारी-पणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाही असं आगरकर म्हणाले होते. अस्पृश्यांचा उद्धार स्पृश्यांनी केला पाहिजे यात मोठेपणा नाही. उलट स्पृश्यांनी करावयाचे ते एक प्रायश्चित आहे बाबासाहेबांचे म्हणणे होते की अशा उद्धाराच्या भाषेची गरजच काय मुळी ? अस्पृश्यतेच्या प्रश्नाचे स्वरूप केवळ धार्मिक नसून ते एकंदर हिंदू समाजव्यवस्थेशी निगडित आहे. मनुष्य म्हणून मानाने जगण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. म्हणून समाजाच्या राजकीय व आर्थिक क्षेत्रात अस्पृश्यात इतराबरोबरचे सर्व हक्क मिळावेत म्हणून त्यांनी स्वतंत्र लढा उभारला व त्याचे अखेरचा श्वास सोडीपर्यंत झुंजार नेतृत्व केले.

ज्ञानाची कठोर व उग्र साधना करीत ते १९१९ पर्यंत समाजाचा अभ्यास करीत होते. टिळकांप्रमाणे तेही म्हणत होते की मला न्याय हवा, भीक नको. आपल्या दलित बांधवांना सामाजिक न्याय आणि माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळविण्यासाठी १९१९ च्या शेड्यूल्ड कास्टस कॉन्फरन्सचे अध्यक्षपद स्वीकारले आणि लढ्याला आरंभ केला. आपल्या 'मूक' जमातीचे 'नायकत्व' स्वीकारून त्यांनी आपल्या जाती जमातींच्या दु:खांना वाचा फोडली. सामाजिक गुलामगिरी, दरिद्रय, अज्ञान यांच्या विळख्यांतून दलितांना मुक्त करावयाचे होते. बाबासाहेबांचा

लढा केवळ दलितांच्या मुक्तीचा नव्हता तर तो मानवमुक्तीचा लढा होता. ग्रीक पुराणातील डिमेटर या देवतेने आपल्या बाळाला दररोज अग्नीवर धरून त्याच्या अंगी अलौकिक शक्ती निर्माण केली त्याप्रमाणे बाबासाहेबांनी आपल्या समाजाला खंबीर बनवले. स्वावलंबन, स्वाभिमान व स्व-ज्ञान ज्या समाजाजवळ असते तोच समाज वाढतो.

आपला उद्धार आपणच केला पाहिजे म्हणून २० जुलै १९२४ रोजी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेची स्थापना केली. शिक्षणसंस्था, वसतिगृहे, व इतर साधनांचा अवलंब करून त्यांनी जनजागरण सुरू केले. 'मूकनायक' आणि त्यानंतर 'बहिष्कृत भारत' ही नियतकालिके त्यानी पदरमोड करून चालविली ती जन-जागरणासाठी. अस्पृश्यता नाकारणे – ती नष्ट करून कायमची गाडून टाकणे हीच त्यांच्या लेखनामागची प्रेरणा होती. बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीद होते की शिका, आंदोलन करा आणि संघटित व्हा एका अर्थाने क्रांतीचा हा महामंत्र होता. आपण म्हणतो की रक्तपाताशिवाय क्रांती नाही आणि क्रांती-शिवाय शांती नाही. क्रांतीचा जन्म ज्यांना अन्याय जाणवतो त्यांच्या मनात होतो. म्हणून आत्मस्थितीचे भान करून द्यावे लागते. ज्यांना हे भान असते तेच अन्यायाविरुद्ध पेटून उठतात. क्रांतीला जे रक्ताचे अर्घ्य हवे असतात ते कुणी सहजासहजी देत नाही. तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य देतो असं सुभाषबाबू म्हणाले होते. पण खरंच या देशाच्या स्वातंत्र्यासाठी किती जणांनी रक्त दिलं? रक्त देण्यासाठी स्वातंत्र्याच्या आकांक्षेनं लोकांची मनं भारून टाकावी लागतात. संघर्षाची वाट तशी सोपी नाही. त्यासाठी खंबीर मन हवे. लोकमान्य टिळक म्हणत की मेलेली मने सचेतन करणे ही संघटनेची पहिली

पायरी आहे. डॉ. आंबेडकरांनी वेगवेगळे उपाय योजून आपल्या समाजाचे मन सचेतन केले. ते म्हणाले होते "आजवर महात्मा गांधीप्रमाणे अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील मोठा कलंक आहे असे आम्ही मानीत होतो पण आता आमची दृष्टी फिरली आहे व तो आमच्या नरदेहावरील कलंक आहे असे आम्ही समजतो, तुम्ही हिंदू धर्माला लावलेला कलंक आम्ही आपल्या रक्ताने धुऊन टाकावा असा जर ईश्वरी नेमानेम असेल, तर आम्ही स्वत:स अत्यंत भाग्यवान समजतो व अशा पवित्र कार्याचे दूत आपण होणार आहोत." हे आवाहन करण्यामागे त्यांची स्पष्ट भूमिका संघर्षाची होती. ते म्हणत असत की वनपर्वात धर्मराजास भीमाने सांगितले आहे की स्वत:चे राज्य नष्ट झाले असता ते 'देग बाई जोगवा' म्हणून मिळत नसते. भिक्षा मागणे हा ब्राह्मणांचा धर्म आहे, क्षत्रियांचा नव्हे याकरिता भिक्षा मागणे सोडून दे. तेजाचा आश्रय कर म्हणजे तुझे हेतू साध्य होतील. नुसत्या धर्मबुद्धीने काही होणार नाही आमच्या मते हीच नीती, अस्पृश्य वर्गास इतरांच्या धर्मबुद्धीवर अवलंबून राहणे ह्याने हरण केलेले सत्त्व परत येत नसते. ज्याने त्याने आपल्या तेजानेच साध्य केले पाहिजे. स्वजातीत तेज निर्माण करण्याचा उद्योग सातत्याने चालवावा लागतो म्हणून त्यांनी विविध आंदोलने सुरू केली. आंदोलनामुळे चळवळ वाढते आणि तिची शक्ती वृद्धिंगत होते. प्रत्येक संघर्षाबरोबर शक्ती वाढते, आत्मविश्वास वाढतो. म्हणून ते म्हणाले होते की आमचे धोरण चढाईचे आहे. आम्ही विनम्र-भावाने व अधोवदनाने जे काही मागावयाचे ते मागत नाही. यामुळे अस्पृश्यता निवारणाला अनुकूल असलेले लोकसुद्धा प्रतिकूल बनतात असा आक्षेप आमच्याविरुद्ध आहे. मला वाटते अस्पृश्या इतका नम्र व लाचार अलम दुनियेत कोण आहे ? आज

शतकानुशतके आम्ही नम्र राहिलो नाही काय ? पाषाणालाही पाझर फोडणाऱ्या दीनावस्थेत व नम्रावस्थेत आम्ही दिवस काढले ना ? आता तरी कृपा करून नम्रतेचे व विनयाचे पाठ आम्हाला देऊ नका. ते आता उच्च वर्णीयांनाच शिकवा. विनंत्या, अर्ज, शिष्टमंडळे यांच्या साहाय्याने गमावलेली स्वातंत्र्ये व दडपलेले हक्क मिळणे शक्य असते तर नेमस्त पक्षाचे लोक आतापर्यंत हिन्दुस्थानचे राजे बनले असते व हिंदूंची धर्मसत्ता अस्पृश्यांच्या घरी पाणी भरू लागली असती. उद्दामपणाची आम्हाला सवय आहे अगर चढेलपणाचे चाळे करण्याची हौस आहें, असे थोडेच आहे ? दिवसभर काबाडकष्ट करून पोटासाठी· दोन घास कसे मिळविता येतील ही विवंचना आमची सोबतीण पण भाकरीपेक्षा माणुसकी श्रेष्ठ म्हणून आम्ही या यातायातीत पडलो. कारण ठोठावल्याशिवाय दरवाजे उघडत नाहीत आणि हिसकावून घेतल्याशिवाय माणुसकीचे साधे हक्कही तुमच्या हातून सुटत नाहीत अशा संघर्षाच्या मार्गानेच समाजक्रान्ती जवळ येणार. म्हणून कोकण जिल्हा अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष या नात्याने २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर आपल्या सहकाऱ्याबरोबर जाऊन तेथील पाणी प्राशन करून बाबासाहेबांनी दलितांच्या मुक्तिसंग्रामासाठी पहिले पाऊल टाकले. या पवित्र्या-मुळे स्पृश्य समाज खवळून उठला. तळे बाटले अशी हाकाटी करीत स्पृश्यांनी अस्पृश्यावर निर्दय हल्ले केले. जेवत असलेल्या अस्पृश्य जनतेवर लाठ्या-काठ्यांचे हल्ले झाले. स्पृश्य लोक इतके मूर्ख की त्यांनी दुसरे दिवशी गोमूत्र शिंपडून तळे शुद्ध केले असे म्हणतात बाबासाहेबांनी हा 'धर्मसंगर' का केला? कारण चवदार तळ्याचे पाणी प्याल्याने आम्ही अमर होऊ अशातला काही भाग नव्हता असे ते म्हणाले. इतराप्रमाणे

आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्यासाठी हा सत्याग्रह होता. अस्पृश्यता नष्ट करून समता प्रस्थापित करण्याचा हा कार्यक्रम जो त्यांनी स्वीकारला होता याचे कारण आपल्याशिवाय इतर लोक अस्पृश्यतानिवारण आणि समतेची स्थापना करू शकणार नाहीत अशी त्यांची पक्की खात्री होती. आपणच आपल्या भाग्याचे शिल्पकार झालो पाहिजे अशी त्यांची श्रद्धा होती. ते एका भाषणांत म्हणाले होते, "जपानातील सामुराई वर्गाचे राष्ट्रप्रेम ब्राह्मणवर्गात नाही. सामुराई वर्गाने आपले विशिष्ट सामाजिक हक्क सोडून देऊन राष्ट्रैक्य साधण्यासाठी समतेच्या पायावर राष्ट्राचा एकोपा करण्यासाठी जो स्वार्थत्याग केला तितका स्वार्थत्याग करणे आमच्या ब्राह्मणवर्गाच्या हातून होईल अशी आशा करणे नको. ब्राह्मणेतर वर्गाच्यानेही ही कामगिरी होईलसे दिसत नाही." समाजक्रान्तीच्या कामी जो समाज लुळा असतो त्याच्या मदतीची इच्छा धरून चालणार नाही. लावी पक्षीण आणि तिची पिले या धड्यात सांगितलेल्या पिकाच्या कापणी करता शेजाऱ्यावर अवलंबून राहणाऱ्या शेतकऱ्याची जी गत झाली तीच गत आपली होईल असा इशारा त्यांनी दिला होता. जो दुसऱ्यावर विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला हेच खरे. म्हणून बाबासाहेबांचा आग्रह होता की दलितांचा मुक्तिलढा आपण आपल्या सामर्थ्यानेच लढविला पाहिजे.

चातुर्वर्ण्यांतर्गत अस्पृश्यता नाहीशी व्हायला हवी हे त्यांच्या विचाराचे मुख्य सूत्र होते. ते म्हणत की चातुर्वर्ण्यव्यवस्था ही लोकविग्रहकारी व्यवस्था आहे व एक वर्णी व्यवस्था लोकसंग्रह-कारी व्यवस्था आहे हे उघडयाडोळयांनी दिसत असता जिने विग्रह होतो अशा व्यवस्थेचा उदो उदो करणाऱ्या हिन्दु समाजाला

वारंवार हार खावी लागणे अटळ आहे. म्हणून चातुर्वर्ण्याची चौकट मोडून तोडून टाकली पाहिजे. एवढेच नव्हे तर आजच्या समाजव्यवस्थेतील असमानता नष्ट केली पाहिजे. कारण एका हाताने हिंदू समाजातील असमानता व्यक्तीचा विकास खुंटवून तिला व पर्यायाने समाजाला खुरटा करते तर दुसऱ्या हाताने हीच असमानता व्यक्तीत साठवून ठेवलेल्या कार्यशक्तीचा, बुद्धीचा समाजास उपयोग करून देत नाही. समाभीधिष्ठित समाज हे बाबासाहेबांचे स्वप्न होते त्याचसाठी समाजक्रान्ती त्यांना हवी होती. समाजक्रान्ती अत्याचारी मार्गाने होऊ नये असे त्यांना वाटे पण ती अत्याचारी होईल की अनत्याचारी होईल हे सर्वस्वी स्पृश्य लोकांच्या वागणुकीवर अवलंबून आहे.

पण दुर्दैव असे की स्पृश्यजमातीतील फारच थोडे बाबासाहेबांना समजू शकले. जात ही विचित्र गोष्ट आहे. विनोदाने म्हणायचे तर जी कुणाच्याच डोक्यांतून जात नाही ती 'जात.' स्वातंत्र्य मिळून तीस वर्षे लोटली तरी अजून नेमणुका, निवडणुका 'जाती' च्या आधारेच जिंकल्या जातात. जातीचा अंमल समाजाच्या सर्व क्षेत्रात दिवसेंदिवस वाढतोच आहे. जातीजातीतील उच्चनीचभाव समाजमनात इतका खोलवर रुजला आहे की या जातीच्या हरळींचे मूळ नष्ट करण्यासाठी प्रभावी विचारांचे ट्रॅक्टर्सच हवेत. बाबासाहेब म्हणाले होते की या भारत देशात जात हा एक हिंस्त्र, विराट राक्षस आहे. कोणत्याही वाटेने जा तो राक्षस तुम्हाला अडवणारच. जातीचा राक्षस ज्या दिवशी मरेल त्या दिवशी नव्या भारताचा जन्म होईल. बाबासाहेब म्हणत की हिंदूसमाज हा एक मनोरा आहे. एक एक जात म्हणजे एक मजला होय. या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका

मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे, त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातील इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो किती नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कुणाची प्राज्ञा नाही. अशा जातीजातींनी बांधलेल्या हिंदुसमाजाला जाग आणण्यासाठी त्यांनी महाडच्या चवदार तळ्याच्या धर्मसंगरानंतर 'मनुस्मृती'चे दहन केले. मनूचे तत्त्वज्ञान विषमतेला खतपाणी घालणारे होते म्हणून मनुस्मृतीच्या दहनाच्या निमित्ताने बाबासाहेबांनी विषमतेला, भेदाला पोसणारी समाजव्यवस्थाच नाकारली. ज्या मनुस्मृतीची पकड सर्व हिंदुधर्मीयांच्या मनावर कायमची घट्ट बसलेली आहे जिला पवित्रग्रंथ म्हणून मानले जाते तिचे दहन कशासाठी? तर ती अस्पृश्यांना 'माणूस' पण नाकारते म्हणून. २५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृतीचे दहन झाले ते प्रतिकात्म होते या दहनाने अस्पृश्यांच्या मनाला नवी शक्ती मिळाली. पन्नास वर्षांपूर्वी मनुस्मृतीचे दहन ही एक क्रांतिकारक घटना होती. प्रस्थापित सनातनी प्रवृत्तींना यामुळे हादरा बसला व त्याचे पडसाद सर्वत्र उमटले. प्रतिगामी शक्तींना आव्हान दिल्याशिवाय, आक्रमक व लढाऊ पवित्रा घेतल्याशिवाय क्रांतीचे पाऊल पुढे पडत नाही. यामुळे क्रांतीचा विचार तळागाळापर्यंत पोचायला मदत होते. प्रस्थापित प्रवृत्ती चिडून उठतात, क्रांतीला चिरडून टाकण्यासाठी सगळे बळ एकवटतात. दहशतीचे, भीतीचे वातावर निर्माण करतात पण आंबेडकरांचे म्हणणे होते की निर्भयपणे आपला लढा चालू ठेवला पाहिजे. जो अन्याय करतो त्याचे हात थकतात आणि ज्याच्यावर अन्याय होतो त्याची प्रत्येक अन्यायाबरोबर ताकद वाढत जाते. आणि एक दिवस

जुलुमी सत्ता, प्रवृत्ती कोसळतात. म्हणून धीर न सोडता ध्येयासाठी, मूल्यांसाठी लढले पाहिजे.

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन या दोन घटनांनी आंबेडकरांनी सवर्ण हिंदू समाजाची झोप उडविली. त्या मागोमाग नाशिक येथील सुप्रसिद्ध काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह सुरू केला. या वेगवेगळ्या 'सत्याग्रहा' तून ते सवर्णांना विचारीत होते की शेकडो वर्षे ज्या सवर्ण हिंदूंनी आम्हाला माणुसकीच्या हक्कापासून दूर ठेवले तेच हिंदू आम्हाला माणुसकीचे हक्क देणार आहेत का ? देशाच्या कानाकोपऱ्यातून 'अस्पृश्य' या मुक्तिलढ्यात सामील होऊ लागले. अस्पृश्यांच्या अंत:करणात स्वाभिमानाची ज्योत पेटविण्याचे काम त्यांनी केले या छोट्यामोठ्या 'सत्याग्रहा' बरोबरच राजकीय हक्काचा लढा त्यांनी चालू केला. सायमन कमिशनच्या आगमनामुळे ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्रचंड क्षोभ उसळला. त्यावर एक उपाय म्हणून ब्रिटिश सरकारने पहिली भारतीय गोलमेज परिषद लंडन येथे बोलाविली (१९३०) काँग्रेसने यावर बहिष्कार टाकला. भारतीय अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बाबासाहेबांनी आपल्या दलित बांधवांच्या राजकीय हक्काची कैफियत मांडली. ते म्हणाले की अस्पृश्यता नष्ट करून नागरिकत्वाचा समान दर्जा प्रस्थापित करण्यासाठी मूलभूत हक्क द्यावेत व त्यांचा निर्वेध उपयोग करता यावा. अस्पृश्यता मानणाऱ्यांना कडक शासन करावे. सामाजिक बहिष्काराचा अवलंब करून वागणाऱ्यांना शिक्षा द्याव्या. स्पृश्य आणि अस्पृश्य यांना समान संधी, समान न्याय द्यावा आणि अस्पृश्यांना कायदेमंडळात, सरकारी नोकऱ्यात पुरेशा जागा द्याव्या. आज भारत स्वतंत्र झाला तरी या मागण्या अद्याप

कागदावरच आहेत. घटनेनें या मागण्यांना कायदेशीर रूप दिले असले तरी प्रत्यक्ष अनुभव असा आहे की अस्पृश्यांना पदोपदी अपमानीत करण्याचे सत्र चालूच आहे. गोलमेज परिषदेपासून अस्पृश्यांच्या प्रश्नांवर गांधी–आंबेडकर संघर्ष उग्र स्वरूप धारण करू लागला. १९३२ च्या ब्रिटिश सरकारच्या जातीय निवाडयानुसार सरकारने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला आणि सर्वसाधारण मतदारसंघातही त्यांना मताधिकार दिला. या जातीय निवाडयाविरूद्ध गांधीजींनी येरवडयाच्या तुरुंगात आमरण उपवास सुरू केला. वातावरण तापत गेले. बाबासाहेब यावेळी उदारपणे वागले. 'पुणे करारा' मुळे गांधीजींचे प्राण वाचले. त्यातून कायदेमंडळात व नोकऱ्यांत अस्पृश्यांना राखीव जागा तेवढया मिळाल्या. गांधीजी अस्पृश्यता निवारणासाठी मनोमन झटले पण ते भूतदयेपोटी. त्यामुळे या प्रश्नावर त्यांना कधीच क्रान्तीकारक पावले उचलता आली नाहीत. हिंदुधर्मात राहून अस्पृश्यांना काही भवितव्य नाही हे बाबासाहेबांना अनुभवाने पटत चालले. अस्पृश्य समाजाला उच्चवर्णीय हिंदुच्या गुलामगिरीतून कायमचे मुक्त करावे, त्याना स्वतंत्र जीवनाच्या वातावरणात नेऊन सोडावे म्हणून येवले येथे आक्टोबर १९३५ मध्ये धर्मान्तराची घोषणा केली. मी हिंदु धर्मात जन्माला आलो असलो तरी हिंदु म्हणून मी मरणार नाही ही प्रतिज्ञा खरी करून दाखवता आली त्याचा आनंद बाबासाहेंबांच्या डोळ्यांतून कसा ओसंडत होता ते मी प्रत्यक्ष पाहिले आहे. अखिल मुंबई इलाखा महार परिषदेत (१९३६) त्यांनी आपली तात्त्विक भूमिका मांडली १९३६ ते ५६ या वीस वर्षात बाबासाहेबांनी जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था इ. वर प्रचंड हल्ले चढविले. सवर्ण हिंदु समाजाने अनेक पातळ्यांवर त्यांना विरोध केला. पंजाब येथील

जात-पात-तोडक मंडळाच्या वार्षिक (१९३६-३७) समारंभ-प्रसंगी अध्यक्ष म्हणून 'जातीयतेचे उच्चाटन' या विषयावर ते भाषण करणार होते. पण तयार केलेल्या भाषणातील मूलगामी, धक्कादाक विचार पाहून पदाधिकाऱ्यांनी त्यांचे भाषणच रद्द केले. पुढे तेच भाषण 'ॲनिहिलेशन ऑफ कास्टस्' या नावाने प्रसिद्ध केले. प्रस्थापित व्यवस्था, सत्ताधारी नेहमीच भेकडवृत्तीने जगतात. त्यांना तेजस्वी विचार पेलवत नाहीत. पण त्यांच्या हे लक्षात येत नाही की विचार कधी मरत नाही. तो जनतेच्या मनात मुरला की मग प्रक्षोभ वाढतो आणि हा प्रक्षोभ दुष्ट सिंहासने पालथी करून टाकतो. विचाराचा पराभव विचारच करू शकतो, ते काम तरवारीचे वा संहारक शस्त्रांचे नाही. १९४२ ते ५४ पर्यंत बाबासाहेबांच्या शे. का. फेडरेशनची ताकद वाढतच गेली. त्यांनी भारताला राज्यघटना दिली पण त्यांनी तयार केलेले हिंदू कोड बिल पास झाले नाही. नेहरू मंत्रिमंडळात तर त्यांना पक्षपाती वागणूक मिळाली आणि सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे वर्गीकृत जाती-जमातींचा प्रश्न त्रिशंकूप्रमाणे लोंबकळत ठेवला. आपल्या राजिनामाविषयक निवेदनात ते म्हणाले की आपल्या सरकारबद्दल मी नाराज का झालो याची दुसरी बाजू आहे; ती म्हणजे मागासलेले वर्ग आणि वर्गीकृत यांच्या हिताबद्दल सरकारने जी अनास्था दाखविली ती होय. दलितवर्गासंबंधी घटनेत जी तरतूद केलेली आहे ती माझ्या मते सर्वस्वी अपुरी आहे, तथापि ती तरतूद समाधानकारक नव्हती तरी मी तिला मान्यता दिली. हेतू हा की या तरतुदीची सरकारने मनापासून अंमलबजावणी केली तर दलितवर्गाच्या उन्नत्तीचे कार्य फारसे झाले नाही तरी काही तरी होईल. वरिष्ठ वर्गाकडून दलितवर्गावर पूर्वी जे जुलुम, अत्याचार आणि दहशतीचे प्रकार

प्रकार होत तेच जुलुम, अत्याचार आणि दहशतीचे प्रकार अद्यापही होत आहेत व ते अत्यंत अमानुष स्वरूपात होत आहेत. महात्मा गांधी म्हणाले होते की तुमच्या हाती सत्ता आली आणि त्यावेळी जर अस्पृश्यतेचा कलंक कायमच राहिला तर माझी खात्री आहे की असलेल्या त्या स्वराज्यात अस्पृशांची स्थिती हल्लीपेक्षा फार वाईट होईल. कारण स्वराज्यात आमच्यातील दोषांना व चुकांना सत्तेचा आधार मिळेल. म्हणून ही अस्पृश्यता-निवारणाची आत्मशुद्धी स्वराज्याची एक अपरिहार्य शर्त आहे. पण गांधीजींचा जयजयकार करणं एवढेच आम्हाला माहीत. गांधीजी जे म्हणाले ते सत्तेवर असणाऱ्यांनी कधीच लक्षात घेतले नाही. स्वातंत्र्यात तर दलित अधिकच असुरक्षित झाले आहेत. म्हणूनच नामदेव ढसाळ विचारतो की स्वातंत्र्य हे कंच्या गाढवीचं नाव ?

जे अनुभव आले, वीस वर्षे जे चिंतन केले त्यातूनच बाबासाहेबांनी धर्मांतराचा निर्णय घेतला, धर्मांतराची ही ऐतिहासिक घटना म्हणजे दलितांच्या मुक्तिसंग्रामातील नव्या पर्वाची नांदी होती. १९२० नंतर बाबासाहेबांनी जे वैचारिक आंदोलन आणि मानव-मुक्तीचा लढा पुकारला होता त्यातले महत्त्वाचे पाऊल म्हणजे बौद्धधर्मस्वीकार ! अस्पृश्यता-निवारणासाठी जे जे प्रयत्न झाले त्यामुळे अस्पृश्य म्हणून गणला जाणारा, राखला जाणारा, मानहानीचा, धार्मिक हीनतेचा दोष कुठे कमी झाला ? अस्पृश्यांचा प्रश्न हा हिंदू समाजातील परिवर्तनाशिवाय, मूलभूत बदलाशिवाय कसा सुटेल ? हिंदू धर्मात अस्पृश्य म्हणून राहणे भारतीय लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने विघातक होते व कोटयावधी दलित जनतेच्या विकासाच्यादृष्टीने अन्याय्य होते म्हणून बाबासाहेबांनी 'धर्मांतरा'चा क्रांतिकारक निर्णय घेतला ज्यांना

हा निर्णय एक राजकीय स्टंट वाटतो त्यांना बाबासाहेबांचा मुक्ति-संग्राम नीट समजून घेता आला नाही असेच म्हणावे लागेल. धर्म माणसासाठी असतो. ज्या धर्मात अस्पृश्यांना पशूपेक्षाही हीनपणें वागवण्यात येते त्या धर्मात का म्हणून राहावे ? लो. टिळक म्हणाले होते की मला न्याय हवा, मी दयेच्या याचनेसाठी उभा नाही. बाबासाहेब आंबेडकरांची हीच भूमिका होती. ते अस्पृश्यांच्या वतीने न्याय मिळविण्यासाठी लढ होते. दयेची, सहानुभूतिची भीक मागण्याची त्यांची वृत्ती नव्हती. ज्या धर्मात माणुसकी, शील, चारित्र्य, संघटना, शिस्त, सौजन्य यांचा सर्वव्यापी लाभ घेता येईल म्हणून ते बौद्धधर्माच्या स्वीकाराला तयार झाले. अस्पृश्यतेचे निर्मूलन केवळ राजकीय हक्क मिळवून होईल असे त्यांना वाटत नव्हते. आर्थिक व सामाजिक समतेशिवाय लोकशाही जिवंत राहणार नाही. म्हणून मला वाटते की धर्मांतर म्हणजे एक नवा मुक्तिमार्ग होता, धर्मांतर म्हणजे नवे सांस्कृतिक पुनरुत्थान होते. धर्मांतरामुळे अस्पृश्य समाजाच्या मानसिक शृंखला तोडल्या. मी बौद्ध आहे मी आता माणूस आहे या भावनेची ज्योत 'धर्मांतरा' नेच पेटविली, दलित जनतेने आपले 'दलितपण' टाकले, त्यांनी हिंदू देव-देवतांचा त्याग केला, बुद्धविहार उभे राहू लागले, प्रार्थना धीरगंभीर आवाजात होऊ लागल्या. बौद्धमहासभा स्थापन झाल्या. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाचा अभ्यास सुरू झाला या धर्मांतरामुळे बाबासाहेबांना आपल्या बांधवांचे मन आमूलाग्र बदलता आले, त्यांची अस्मिता, त्यांचा अभिमान जागा करता आला. त्यांच्या 'वेदने'ला अर्थ आला. त्याच्या विद्रोही भूमिकेने सवर्ण हिंदू हादरून गेले. अस्पृश्यांचा मूळ प्रश्न सामाजिक आहे. माणूसपण नाकारलेल्या समाजाला माणूस म्हणून प्रतिष्ठित

करण्याचा मार्ग म्हणजे धर्मांतर! पण 'धर्मांतर' जसजसे अधिक प्रमाणात झाले तसतसे त्यांच्यावर गावगाड्यात नवी संकटे कोसळली. स्वाभिमानी, नव्याने जाग्या झालेल्या समाजाला दडपण्याचे अमानुष तंत्र हितसंबंधीयांनी अमलात आणले. बाबासाहेबांच्या निधनानंतर तर अत्याचार, दहशतवाद वाढतच गेला. धर्मांतराने घडून आलेली मानसिक क्रांती ही सर्वंकष क्रांतीची नांदी होय.

स्वातंत्र्य मिळाले तरी जातीसंस्था व अस्पृश्यता यांच्यामुळे राजकारणात, समाजकारणात, शिक्षणक्षेत्रात-नव्हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात विषमतामूलक प्रवृत्ती उफाळून येत आहेत. सत्ता हस्तगत तरी करावी किंवा मूल्ये पायदळी तुडवून सत्ता हातात ठेवावी यात राजकीय पक्ष गुंतलेले आहेत. त्यांना समाज-परिवर्तनाची, माणूस सुखी करण्याची गरज वाटतेच कुठे? उलट दलितांवरील अत्याचाराकडे मख्खपणे ते पहात तरी आहेत किंवा त्याला खतपाणी तरी घालीत आहेत. मूठभर लोक सत्ता आणि संपत्ती यांचा अमाप भोग घेत आहेत आणि देशातील दलित, आदिवासी, गिरीजन आदी मागासलेल्या जाती दारिद्र्य, अज्ञान, दास्य, अन्याय यांच्या विळख्यातून मुक्त झालेल्या नाहीत. उलट या जाती कधीच मुक्त होऊ नयेत म्हणजे सत्ता व संपत्ती निर्वेधपणे भोगता येईल असे राजकीय पक्षाचे मनसुबे आहेत. सभास्थानी ते स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत अशा घोषणा करतील पण धोरण मात्र उलट असेल. 'संपूर्ण क्रांती' ची कल्पना मांडताना जयप्रकाश म्हणाले, "गेल्या पंचवीस वर्षात अनेक कायदे झाले. जमीन सुधारणेचे कायदे झाले. अस्पृश्यता निवारणाचे कायदे

झाले. हे सर्व कायदे होऊनही भूमिहीनांना जमीन मिळाली नाही आयुष्यभर एकाच जमीनदाराकडे गुलामाचे जिणे जगणारी कुटुंबेच्या कुटुंबे बिहारात आहेत. दलितांचे हाल तर विचारूच नका. त्यांना अजूनही मंदिरात जाऊ देत नाहीत. पाणी भरू देत नाहीत. मानसन्मान यापासून ते अद्याप कित्येक योजने दूरच आहेत. या दलितबांधवांना सामाजिक, आर्थिक न्यायापासून किती काळ लांब ठेवणार ?" जयप्रकाशांचा प्रश्न अचूक आहे तो सोडवावा असे कोणत्याच सत्ताधारी पक्षाला पाटत नाही. प्रत्येक पक्ष दलितांना, अल्पसंख्यांकांना न्याय देण्याची अगदी उच्चरवाने भाषा करतो. वेळीअवेळी जे न्याय देण्याची भाषा करतात ते कधीच न्याय देऊ शकत नाहीत. किंबहुना त्यांना दुसऱ्यांना न्याय मिळावा असे वाटतच नसते. एकतर दलितावर जे अत्याचार होतात ते सर्वच्या सर्व दखलपात्र गुन्हा म्हणून नोंदले जात नाहीत. दुसरे असे की जे नोंदले जातात ते या ना त्या रीतीने दडपले तरी जात असावेत किंवा वेगवेगळ्या प्रकारचे दबाव आणून मिटवा मिटवी तरी केली जात असावी. याचा अर्थ एवढाच की सत्तेच्या पाठिंब्याने वा अन्य कुणाच्या तरी पाठिंब्याने अत्याचार करणाऱ्या विघातक शक्ती वाढत जातात, पोसल्या जातात. भोंगळ व सुस्त अशा प्रकारची कायदेविषयक कार्यपद्धत देखील या अत्याचाराच्या पाशवी प्रवृत्तीना कुरण मोकळे करून देते. अत्याचार करणाऱ्या व्यक्ती विरुद्ध वा समुहाविरुद्ध शासन काय कारवाई करते याची जनतेला माहिती नसते. त्यामुळे अत्याचार करणारे, त्या अत्याचाराच्या बातम्या देणारे, त्याची हत्तीवरून पाहणी करणारे, त्याचे राजकीय भांडवल करून वेळी अवेळी ओरडणारे, त्या अत्याचारांची या ना त्या मार्गाने वासलात लावणारे प्रवाह कायमच आहेत हे प्रवाह केव्हा नष्ट होतील

असा दलितसमाजासमोरील गहन प्रश्न आहे. एखाद्या दलिताने आमचा छळ का होतो असा सवाल जर एखाद्या तहसिलदाराला केला तर तो उर्मटपणे म्हणतो –

"मला सांग भडव्या, वाघ शेळीवर का हल्ला करतो ? " अशी प्रवृत्ती सर्व खेडोपाड्यात, शहरात देखील आहे. कारण येथे दुर्बल घटकांना पुरावा देता येत नाही आणि पुराव्याशिवाय न्याय कसा मिळेल ? म्हणजे याचा अर्थ दलितांनी शेळी होणे सोडून दिले पाहिजे आणि हिंस्त्र वाघांना धडा शिकविला पाहिजे.

१९५६ पासून दलितांवर महाराष्ट्राच्या विविध भागात जे अत्याचार झाले, ते सर्वच नोंदलेले नाहीत. १९५६ पासून ते १९६४ पर्यंत प्रबुद्ध भारतात आलेल्या वृत्ताच्या आधारे पाहिले तर सुमारे २०० अत्याचारांची ठळक प्रकरणे नोंदली गेली आहेत असे म्हणता येईल. या प्रकरणांचे पुढे काय झाले त्याचा शोध घेणे निष्फळ ठरते, या प्रकरणाच्या संख्येत पुढे पुढे तर भरच पडली आहे.

स्वराज्याचा सूर्य उगवला तरी दलित वस्तीत अन्यायाच्या छळाच्या वरवंट्याखाली माणसे भरडली जात आहेत खेड्यापाड्यात दलितावर अत्याचार होतातच. त्यांना अजून सर्वत्र सार्वजनिक विहिरीवरून पाणी घेता येत नाही. माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगणे त्यांना अशक्य करून ठेवले आहे. सुशिक्षित पांढरपेशा समाजातील काही ब्राम्हण म्हणतात की खेड्यात ब्राम्हण राहिलाच नाही. तेव्हा तो अत्याचाराला जबाबदार कसा ? असे म्हणून ब्राम्हणांना उपरणे झटकून मोकळे होता येणार नाही. अत्याचार कुणीही केला तरी तो अत्याचारच. अत्याचार करीत राहणाऱ्या प्रवृत्ती

मागे ब्राम्हणधर्म आहे तसेच पंचायत, जिल्हा परिषदा, सोसायटचा, साखर कारखाने, नगरपालिका, महापालिका इ. ठिकाणी असलेली सत्ता भोगणारी एक जमात आहे. माणसाने माणसावर अत्याचार करावा ही गोष्टच मनुष्यत्वाची प्रतिष्ठा या सर्वोच्च मूल्याची पायमल्ली करणारी आहे. म्हणून ब्राम्हणांच्यावर आता एक जबाबदारी आहे की त्यांनी आपल्या पापाचे प्रायश्चित म्हणून का होईना दलितांच्या बाजूने अत्याचार करणाऱ्या, अन्याय करीत राहणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध संघर्ष केला पाहिजे.

नोंदलेल्या अत्याचारांची जर पाहणी केली तर जवळजवळ १२५ प्रकारचे अत्याचार वेगवेगळ्या कारणामुळे होत असतात. गावकीची कामे करावयास नकार दिला, गांवच्या धार्मिक उत्सवात भाग घेतला नाही, आंबेडकरजयंती निमित्त वा बुद्धजयंती निमित्त मिरवणूक काढली, गणेशोत्सवाची किंवा अन्य जत्रेची वर्गणी दिली नाही, सरपंचाच्या वा अन्य सत्तेची खुर्ची भोगणाऱ्या माणसाच्या वासनातृप्तीसाठी आपली बायको वा बहीण वा मुलगी देण्यास नकार दिला, फुकट कामे करण्याचे नाकारले तर दलितां-वर अत्याचार होत असतो. काही वेळा गावचे गाव बहिष्काराचा बडगा उगारते. दलित व्यक्तिला निर्दयपणे मारहाण केली जाते. कधी हत्याराने कधी चाबकाने, कधी झाडाच्या फोकाने, कधी पट्टीने तर कधी सायकलच्या चेनने तर कधी खिळ्याच्या बुटानी मारहाण केली जाते. महिला आणि मुले तर या अत्याचाराच्या प्रवृत्तीचे कायमचे लक्ष्य. महिलांच्यावर कधी घरात घुसून बलात्कार तर कधी सार्वजनिक ठिकाणी पाचपाच सहासहा माणसे दलितस्त्रीच्या शरीराचा भोग घेतात. कधी महिलांना विवस्त्र करून धिंड काढली जाते तर कधी त्यांना अमानुषपणे मारले जाते कधी माणसासकट त्यांच्या झोपड्या पेटविल्या जातात तर कधी

त्यांची गुरे-ढोरे जाळली जातात त्यांची चिजवस्तू, गाड्या त्यांचे कपडे यांची राख केली जाते. त्यांची आर्थिक पिळवणूक, नाकेबंदी करून त्यांचे खोटे कबुलीजबाब घेतले जातात. काम न देणे, कामावरून अचानक काढून टाकणे. कामाची मजुरी गडप करणे, वेळेवर औषधोपचार न करणे, खोट्यानाट्या आरोपात, किटाळात गुंतविणे, खोटे खटले दाखल करून छळणे, त्यांच्या पिकाला आगी लावणे. बाजारात मीठ मिरची इ. नित्योपयोगी वस्तू मिळू न देणे, झाडे पाडणे, राहत्या घरांवर विष्ठा, घाण फेकणे कितीतरी अत्याचाराचे प्रकार सर्वत्र चालू आहेत. शिवाय पोलिस तर या ना त्या रीतीने नित्य छळतात, धाकदपटशा दाखवून लुबाडतात, गुन्हा नोंदवून घेण्याची चाल-ढकल करतात. चौकीवर हेलपाटे घालायला लावून बेजार करतात.

म्हणून मला वाटते या अत्याचाराचा प्रश्न कायदा व सुव्यस्थेशी निगडीत आहे. गावकुसाबाहेर राहणाऱ्या या दलितांना गावकुसाच्या आत जागा नाहीच नाही पण दलितांना आपण सुरक्षित आहोत असे वाटत नाही. दलितजमाती भयग्रस्त आहेत. त्याना भयमुक्त करणे हे शासनाचे काम आहे म्हणून अत्याचार करणाऱ्याला कठोर शासन झाले पाहिजे तसे ज्यांच्या हाती कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे काम सोपविले आहे त्यांना शासनाचा धाक वाटला पाहिजे. अत्याचाराच्या घटनेच्या चौकशीचे काम आणि गुन्हेगारांना शासन करण्याचे काम कमीत कमी वेळात म्हणजे किमान सहा महिन्यात पुरे झाले तर ज्याच्यावर अत्याचार होईल त्याला निदान न्याय मिळेल अशी खात्री वाटेल. न्यायदानास विलंब म्हणजे एक प्रकारे अन्यायच होय. पण जोपर्यंत दलितावर होणाऱ्या अत्याचारामुळे आपण

माणूसकी पायदळी तुडवीत आहोत असे शासनाला वा पक्षाना वाटत नाही तो पर्यंत या अत्याचाराविरुद्ध कणखर पवित्रा घेणें त्यांना शक्य होणार नाही. सध्या वाढत चाललेल्या अत्याचाराच्या घटनांची चौकशी करणाऱ्या समित्या नेमणे हा भारतीय लोकशाहीतील आणखी एक राग कारण या समित्या लिंग, जात, पक्ष इ. दृष्टिकोन स्वीकारल्यामुळे तयार होतात. समित्यातील सदस्यांना सामाजिक प्रश्नाचे गांभीर्य समजत नाही आणि त्यांना रस असतो तो भत्त्यात आणि प्रतिष्ठेत. समित्या नेमून कारभार करणे म्हणजे पैशाची उधळपट्टी आणि वेळेचा अपव्यय असाच अनुभव अलीकडे येतो.

म्हणून दलितावरील अत्याचाराच्या संदर्भात समाजमन बदलण्याचाच कार्यक्रम हाती घ्यायला हवा. समाजमन असे एकाएकी आणि सुखासुखी बदलत नाही. तर जातिभेदावर कुऱ्हाड घालून अस्पृश्यतेचे पाप मुळातच मारुन टाकणाऱ्या गौतमबुद्ध प्रणीत क्रांतीचा पुरस्कार केला पाहिजे. "जग बदल घालुनि धाव" असे अण्णाभाऊ म्हणाले होते. या अत्याचाराच्या प्रवृत्तीची मुळे नष्ट करायला हवीत.

दुसरा मार्ग म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांचा सर्वंकष क्रान्तीचा मार्ग. या मार्गानेच क्रान्ती होईल. अन्यथा अत्याचार कधीच थांबणार नाहीत. हिंसाचार हिंसाचारालाच जन्म देतो, सूड हा सूडच प्रसवील. म्हणून हे चक्र थांबले पाहिजे.

या शारीरीक अत्याचाराबरोबर एक प्रकारचा मानसिक अत्याचार दलितवर्गीयांना विशेषतः त्यातील शिक्षित तरुणांना सोसावा लागतो शासकीय कार्यालये, उद्योगधंदे, विद्यापीठे, शिक्षणसंस्था इ. ठिकाणी राखीव जागावर दलित व्यक्तीच्या

नेमणुका होतात. या राखीव जागामुळे दलितेतर व्यक्ती दलिताचा राग करतात, त्याना घालून पाडून बोलतात त्यांची अवहेलना करतात, त्यांना अकार्यक्षम ठरविण्यासाठी वेगवेगळे उपाय योजतात आणि पर्यायाने दलिताला भाकरी देखील निश्चितपणे खाता येत नाही तर काही दलितेतर अधिकारी आपल्या सत्तेचा, पदाचा वापर करून त्याला हैराण करतात. एका बुद्धिमान दलित तरुणाला पदोपदी अपमानित करून त्याला राजिनामा द्यायला लावल्याची कथा मला माहीत आहे अशा अनेक कथा सांगता येतील. तसेच एका दलित वर्गातील स्त्री डॉक्टरला रोग्यांना औषधोपचार करण्याची किंवा बाळंतपणाच्या केसेस हाताळण्याची संधी न देता प्रशासकीय कामात सतत गुंतवून ठेवून तिचा मानसिक छळ केल्याची एक घटनाही मला माहीत आहे. दलित वर्गावरचे हे मानसिक अत्याचार उजेडात येत नाहीत. पण हळुहळू चाललेल्या छळाचा परिणाम त्या माणसाच्या मनावर होतो. एक नव्याने उमलणारे मन कुसकरून टाकणे बरोबर नाही.

म्हणून शतकानुशतके बद्ध असलेल्या या समाजाला मुक्ततेचा मार्ग दाखविण्यासाठी बाबासाहेबांनी म्हटले होते की अन्याया-समोर नम्र होऊ नका. या देशातील माणसाचे मन बदलण्यासाठी नव्या संस्काराची नव्या दृष्टीची गरज आहे. विद्रोहाची वाट धरल्याशिवाय नवा सूर्य उगवणार नाही हेच खरे.


डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान हे माणसाला मोठे मानणारे तत्त्वज्ञान आहे. या तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून अत्याचारांना सामोरे जायला पाहिजे. या तत्त्वज्ञानात निर्भयपणावर भर आहे. म्हणून जे दुबळे, मागासलेले आहेत ते भयग्रस्त आहेत. तुम्हाला आम्हाला

निरनिराळया भयांनी ग्रासलेलं आहे. भय सत्तेचं आहे, पंथाचं आहे, पक्षाचं आहे, धर्माचं आहे, राजकारणाचं आहे, नोकरशाहीचं आहे. विज्ञानाच्या भयानंतर माणसाचं अस्तित्वच धोक्यात आलं आहे. आपल्या शिरावर संहाराची सतत टांगती तलवार आहे. जो भयग्रस्त समाज असतो त्याची वाढ खुंटते. म्हणून भयमुक्त समाज ही आजची गरज आहे.

आपल्या समाजाच्या नुसत्या चिरफाळया उडालेल्या आहेत. एका गटाचे दुःख दुसऱ्या गटाला जाऊन भिडत नाही. जो तो म्हणतो मला काय त्याचे ? अशा उदासीन, फुटीर वृत्तीने समाजाची विघटनाची प्रक्रिया वाढतच जाईल, असंतोष वाढतच जाईल. या फुटीरवृत्तीमुळे, असंतोषामुळे माणूस दुःखी होत जाईल. बाबासाहेबांनी बुद्धधर्माचे तत्त्वज्ञान मांडले ते हे तत्त्वज्ञान माणसाला कल्याणाची दिशा दाखवील म्हणून. 'शोषणा'च्या विरुद्ध उभे राहणारे बौद्धमत बाबासाहेबांनी जाणिवपूर्वक स्वीकारले. बाबासाहेब म्हणत की मानवमुक्तीचा लढा कोणाच्या तरी निशाणाखाली जाऊन लढू नका. ज्याचा लढा त्याचेच निशाण हवे. ते निशाण म्हणजे माणुसकी मानणारे निशाण. या निशाणाखाली बाबासाहेबांचा विचार घेऊन देशाच्या काना-कोपऱ्यांतून माणसे हळूहळू जमा होऊ लागली आहेत. एक दिवस या विचाराच्या तेजांतून वणवा पेटेल व त्यात सर्व प्रतिगामी प्रवृत्ती, शोषक प्रवृत्ती नष्ट होतील. असा दिवस एकदा उजाडेल यात मला तरी कोणतीच शंका वाटत नाही. कारण वामन निंबाळकर म्हणतात त्याप्रमाणे

या गावकुसाबाहेरचा काळोख मावळणाराहे
आमच्या ओठातील प्रकाशगीताचे स्वर
दाही दिशांना धुंद करणार आहेत
असे सारे एकत्रित या,
हातात हात घालून प्रकाशाचे गीत गा

माझे तरी यापेक्षा दुसरे काय म्हणणे आहे. प्रकाशाचे गीत गा.



| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : तिसरे<br>१९७५ : | |
| **श्री. भा. शं. भणगे**<br>प्राचार्य,<br>चिनाई कॉलेज ऑफ् कॉमर्स अँड<br>अकॉनॉमिक्स, मुंबई. | **आजची आर्थिक परिस्थिती व त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग** |
| **श्री. त्र्यं. कृ. टोपे**<br>कुलगुरु,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. | **समाज सुधारणेच्या समस्या** |
| **डॉ. प्र. चिं. शेजवलकर**<br>संचालक,<br>इन्स्टिटच्यूट ऑफ् मॅनेजमेंट<br>डेव्हलपमेंट अँड रिसर्च, पुणे. | **सद्य:स्थिती** |
| वर्ष : चौथे :<br>१९७६ : | |
| **श्री. गोपाळराव मयेकर**<br>माजी शिक्षण मंत्री, गोवा<br>व प्राचार्य,<br>देवगड कॉलेज, देवगड. | **भारतीय समाजाच्या परिवर्तनाची दिशा आणि वेग** |
| प्रसिद्ध चरित्रकार<br>**पद्मभूषण धनंजय कीर**<br>मुंबई. | **राजर्षी शाहू छत्रपती आणि नवभारताची मागणी** |

या व्याख्यानमालेतील यापूर्वीचे व्याख्याते नि विषय :–

| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष : पहिले<br>१९७३ : | |
| **श्री. देवदत्त दाभोळकर**<br>प्राचार्य,<br>फर्ग्युसन कॉलेज पुणे. | **राजकारण आणि समाजजीवन** |
| **आमदार<br>मा. पं. मंगुडकर**<br>पुणे. | **भारतीय समाजवाद कांही विचार** |
| **प्रा. गं. बा. सरदार**<br>पुणे. | **भारतीय समाजवाद आणि ऐहिक निष्ठा** |
| वर्ष : दुसरे<br>१९७४ : | |
| **प्रा. ए. एम्. खान**<br>श्री शाहू मंदीर महाविद्यालय,<br>पुणे. | **भारतीय लोकशाही : कांही विचार** |
| **श्री. वि. अ. नाईक**<br>न्यायमूर्ती, पुणे. | **लोकशाही समाजवाद** |
| **श्री. सदाशिव बागाईतकर**<br>पुणे. | **अविकसित देशातील समाजवादाचे स्वरूप** |


| व्याख्याते | विषय |
|---|---|
| वर्ष सहावे<br>१९७८ : | |
| **डॉ. भालचंद्र फडके**<br>व्याख्याते<br>मराठी विभाग<br>पुणे विद्यापीठ, पुणे. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक क्रांती** |

आणि यंदाच्या (१९७९) व्याख्यानमालेत

| | |
|---|---|
| **आमदार**<br>**पी. बी. साळुंखे**<br>कोल्हापूर. | **महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे टप्पे** |
| **डॉ. सत्यरंजन साठे**<br>प्राचार्य,<br>लॉ कॉलेज, पुणे. | **भारतीय राज्यघटना आणि सामाजिक परिवर्तन** |

## कऱ्हाड नगरपरिषद -

## - नगरभवन व ग्रंथालय



## प्रीतिसंगमावरील सांस्कृतिक केंद्र

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड ॥
तरि अवधानामृतें वाड । सिंपोनि कीजे ॥